# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
कार्यालयाचा दुरध्वनी क्र.२६४७४४३५, Email : chairman-msbve@nic.in Web site :- www.msbve.gov.in

**शुध्दीपत्र** जा.क्र.मराव्यशिपमं/का-१/मान्यता विभाग/३९०६/२०१३
दिनांक :- 28 NOV 2013

प्रति,

मा.सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
**मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.**

विषय :- माहितीपुस्तिका २०१४-१५ मधील दुरुस्तीबाबत.

संदर्भ :- मंडळाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-१/२०१४-१५/मान्यता/२७९९/२०१३,दि.२३-१०-२०१३

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरुन आपणांस कळवू इच्छितो की, मंडळाचे संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून मंडळाचे मान्यता प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या तुकडीत वाढ करणेसाठी मार्गदर्शक सुचना, छाननी तक्ते, प्रपत्रे नमुने तसेच माहितीपुस्तिका प्रत पाठविणेत आलेली आहे.

सदर माहितीपुस्तिकेमध्ये **"मंडळाचे अभ्यासक्रम कायम विनाअनुदान तत्त्वावर चालविण्यासाठी संस्थेने / सोसायटीने / व्यवस्थापनाने करावयाचा ठराव/हमीपत्र नमुना"** चे **प्रपत्र २ (अ)** अंतर्भूत करणे राहून गेले आहे. त्याची प्रत सोबत सादर करणेत येत आहे.

सबब आपणांस विनंती करण्यांत येते की, संबंधीत संस्थांना सुचना देणेबाबत आपले अधिपत्याखालील जिल्हा कार्यालयांना सुचना देणेत याव्यात, ही सविनय विनंती.

आपला विश्वासू,

सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ५१.

प्रत :-

सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

## मंडळाचे अभ्यासक्रम कायम विनाअनुदान तत्त्वावर चालविण्यासाठी संस्थेने / सोसायटीने / व्यवस्थापनाने करावयाचा ठराव/हमीपत्र नमुना (रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर)

### प्रपत्र - २ (अ)

या हमीपत्राद्वारे मी ____________________ अध्यक्ष / व्यवस्थापक ______________________________________________.

संस्था / आस्थापना नाव ______________________ सोसायटीचा / मंडळाचा / व्यवस्थापकाचा ठराव करून अशी हमी देतो की,

व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम

१) प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणेस मान्यता मिळाल्यास सदरचे १) २) ३) अभ्यासक्रम हे कायम विना अनुदान तत्वावर आम्ही चालविण्यास तयार आहे.

२) सदरच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा जसे साहित्य, यंत्रसामुग्री, फर्निचर इत्यादी हे तात्पुरत्या मंजूरी आदेशाच्या (Letter of Indent) दिनांकापासून १ महिन्यांच्या आत १००% उपलब्ध करून देणेत येईल व आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेत येईल.

३) मंडळाने ठरविलेल्या कार्यक्रमानुसार व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी नियुक्त समितीमार्फत घेण्यात येणाऱ्या निरिक्षणा दरम्यान मी स्वतः अथवा माझे वतीने प्राधिकृत करणेत आलेला सक्षम सदस्य हजर राहून अर्जामध्ये दर्शविण्यात आलेली बांधकाम केलेली जागा, साधनसामुग्री, यंत्रसामुग्री, कर्मचारी वृंद नेमणूक आणि पायाभूत सुविधा इत्यादी बाबतचा तपशिल प्रत्यक्षपणे दाखविण्यात येईल.

४) अर्जामध्ये दर्शविण्यात आलेल्या जागेतच अभ्यासक्रम चालविण्यात येणार आहे आणि त्या जागेच्या बांधकामाबाबतची योग्य त्या प्राधिकृत अधिका-यांकडून मंजूरी घेण्यात आलेली आहे. व सदरच्या जागेत अनाधिकृत बांधकाम नसल्याबाबतची मी हमी देत आहे.

५) जोपर्यंत मंडळाकडून अभ्यासक्रमाची अंतिम मान्यता प्रदान करण्यात येणार नाही तोपर्यंत तो विद्यार्थी प्रवेश करणार नाही.

६) सदरच्या अभ्यासक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा अधिकचे प्रवेश दिले जाणार नाही.

७) शासकीय प्रचलित नियमानुसारच विद्यार्थांना प्रवेश देणेत येतील.

८) अभ्यासक्रमांकरीता शासनाच्या प्रचलित नियमात वेळोवेळी जे बदल होतील ते काटेकोर पाळण्याची याद्वारे हमी देण्यात येत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराचे नाव व सही
कार्यालयाचा शिक्का

**********************************************************************